Monday, March 03, 2025
11:49 AM

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ३/०३/२०२५

दुखापत

| अ.क्र | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पोस्टे वलगाव अपक्र. 512/ 2025 क. 118(1),351 (2),352 बि.एन. | ग्राम रेवसा. | दि. 02/03/2025चे 20/00 वा. दरम्यान दाखल दि. 02/03/2025 चे 22/50 वा. दरम्यान | सुकचैन भैय्या चव्हाण वय 45 वर्ष रा. ग्राम रेवसातता. जि.अमरावती. | करण भुसन कर वय 27 वर्, रा. ह.मु.ग्राम रेवसात | नाही. | हकिकत अशा प्रकारे आहे कि, आज दि. 02/03/2025 रोजी रात्री 08/00 वा. ते सुमारास फिर्यादी हे जिल्हा परिषद शाळे जवळ च्या चौकात बसलो असतांना.मला माझे घरा जवळील मुलगी हिने आवाज देवुन सांगितले कि,तुमचे जावाई तुम्हाला घरा जवळ येवुन शिवीगाळ करीत आहे. त्यामुळे तुम्हाला आत्याने घरी बोलावले आहे. त्यामुळे मी लगेच घरा जवळ जावुन पाहीले असता. माझे जावाई करण हा आम्हाला जोर जोराने शिवागाळ करुन व मला तुमच्या मुली |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एस.प्र माणे दाखल. | | | | | | पासुन लवकर सोड चिठ्ठी द्या नाहीतर मी तुम्हाला सोडनार नाही. अशी धमकी देत होता. तेव्हा फिर्याने आरोपीला समजावुन घरी पाठवले पन तरी सुध्दा त्याची शिवीगाळ करणे चालुच होते थोड्या वेळाने फिर्यादीची मुलगी हि एम.आय.डी.सी अमरावती येथुन कामावरुन घरी आली. असता. जावाई अंगावर धावुन गेल्याने मुलगी जोर जो-यात ओरडली त्या मुळे फिर्यादी व फि.ची पत्नी असे दोघेही बाहेर आलो तेव्हा मुलगी ही करण ला समजावुन सांगुन घरी जाण्या करीता विनवनी करीत असतांना जावाई करण याने त्याचे हातातील लाकडी काठीने फिर्यादी चे डावे हातावर मारली त्यामुळे खांद्याची हड्डी बाहेर आल्या चे समजल्याने फिर्यादी चे पत्नी व मुलगी यांनी मला त्याचे पासुन दुर करुन घरात आणले त्या नंतर जावाई करण हा शिवीगाळ करीत त्याचे घरी निघुन गेला. अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सदर चा गुन्हा दाखल |
| २ | खोलापुरी गेट अप.न. २६/२०२५ कलम ११८(१) भा. न्या. संहीता | महालक्ष्मी कॉम्पलेक्स भाजीबाजार अमरावती | दि. 02/03/2025 चे 12/30 वा. दम्यान<br><br>दि.02/03/2025 चे 15/03 वा. | चंद्रप्रकाश सुर्यभान दुरतकर वय 72 वर्ष रा. महालक्ष्मी कॉम्पलेक्स भाजीबाजार अमरावती | गणेश अनासने वय 50 वर्ष रा. भाजीबाजार अमरावती | नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच घरामध्ये खाली वर राहत असुन त्यांचे आपसात पटत नाही. यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे दुस-या मजल्याचे टेरीसवर ऊभे असतांना यातील नमुद आरोपीने तिस-या मजल्यावर आला त्याने फिर्यादीला पाहुन आरोपीने त्याच्या हातातील दोन फुट लांबीचा व दोन फुट रुंदीचा प्लास्टीक पाईप फायबर नळ फिंटींगचा पाईप त्याचे घराचे तिस-या मजल्यावरुन फिर्यादीचे डोक्यावर फेकुन मारला त्यामुळे फिर्यादीचे डोक्याला जखम होवुन रक्त निघाले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➤ चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पोस्टेवल गाव | देवरी नीपानी | दि. 01/03/2025 चे | किसनराव तानाजी गावंडे वय | अज्ञात | | एक पांढ-या रंगाची | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील नमुद घटना ता. वेळी व ठीकानी यातील फिर्यादी यांचे कोण्यातरी अज्ञात |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अप क्र.51/2025 क.303(2) बि.एन.एस.प्रमाणे दाखल. | | 19/00 वा.ते दि.02/03/2025 चे 06/00 वा. दाखल दि.02/03/2025 चे 13/29 वा. | 27 वर्ष रा. देवरी निपानी ता. भातकुली जि.अमरावती. | | | बैल जोडी कि.अ. 70,000/रु | चोरट्याने फिर्यादीचे मालकिचे बैल जोडी चोरुन नेली आहे. कि.अ. 70,000/रु ची आजु बाजुला शोध घेतेला व विचारपुस केली मिळुनआली नाही. वरुन आज रोजी पोस्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |
| २ | राजापेठ अप क्र ९६/२५ कलम ३०५(अ)BNS | शंकर नगर शिव इंलीश शाळेजवळअमरावती | दि २७/०२/२०२५ चे २३-३० वा . ते दि. २८/०२/२०२५ चे ०७-०० वा. दरम्यान दाखल ता वेळ ०२/०३/२०२५ | राजेश सिकलदास सेवानी वय ५८ वर्ष रा. ५७ बापु कॉलनी तिळके कॉलनी अमरावती | अज्ञात | - | आर.आर.कंपनीचे कॉपरचे वायर एकुण ७२ गुच्छे कि.अं. ९०,००० रू. | हकीगत अशा प्रकारे आहे की , यातील नमुद घ ता वेळी व ठीकाणी यातील फि. यांची ०७ मजली १८ फ्लॅट ची साईड शंकर नगर येथे शिव इंलीश शाळेजवळ सुरू असुन जवळपास बांधकाम पुर्ण झाले असुन त्याचे इलेक्ट्रीक फिटींगचे काम सुरू असल्याने इलेक्ट्रीक फिटींगचे वायर बोर्ड मधुन मिटर पर्यत व बटन फिट करण्यासाठी बाहेर करून ठेवले असुन त्याचा गुंडाळा करून बांधुन ठेवल्या होत्या. ते आर.आर.कंपनीचे कॉपरचे वायर एकुण ७२ गुच्छे कि.अं. ९०,००० रू. चे वायर कोणीतरी अज्ञात |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | चे १६-०८ वा | | | | | चोराने कापुन चोरून नेल्या. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदर गुन्हा दाखल |

➤ वाहन चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व | चोरी गेला माल/मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. १८६/२०२५ क. ३०५(ब) बीएनएस | राजेन्द्र कॉंलनी अमरावती येथील नमस्कार पान सेन्टर अमरावती | घटना ता वेळ - दि. ०१/०३/२०२५ रोजी सायंकाळी ०६/०० वा. दाखल ता वेळ - दि. ०२/०३/२०२५ चे १९/२४ वा. | सागर मनोहरराव गोडसेलवार वय ३४ वर्ष रा. बेलपुरा मस्जीद मागे बेलपुरा अमरावती | अज्ञात | दुचाकी क्र. MH-२७-MH-६९२१ कि.अ.२५००० /- रुपयाची | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे त्याची दुचाकी क्र. MH-२७-MH-६९२१ कि.अ.२५०००/- रुपयाची गाडी नमुद घटना ता वेळी व ठिकाणी रस्त्याच्या कडेला उभी करुन पान ठेल्यावर गेला व दहा मिनीटात परत रोडवर येवुन फिने ठेवलेली त्यांची गाडी पाहीली असता फिला ती दिसुन आली नाही . तीचा आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराणे चोरुन नेली असावी अश्या फिच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हिशन

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | भातकुली. | अपनं 30/25 कलम 85 (1)(2) मदाका | मदाका | तेकडीपुरा भातकुली | घटना ता वेळी –दि. 02-03 -25 चे17/10 वा. | दाखल ता वेळी दि. 02-03-25 चे 18/58 | तर्फे-पो हे कॉं संजय मात्रे बं.नं. 1027 पो.स्टे. भातकूली | चेतन रमेश जोंधळे वय 20 वर्ष रा. तेकडीपुरा भातकुली | | हकीकत अशा प्रकारे आहे की, आरोपीची पत्नि हे पोस्टेला रिपोर्ट देण्याकरीता आली असता नमुद आरोपी हा पोस्टेला येवुन पत्निला जोरजोराने शिवीगाळ करु लागला तो दारुचे नशेत असल्याणे त्याचा मेडीकल केले असता डॉंक्टर सा. यांनी दारु पिण्याबाबत मेडीकल सर्टी दिल्याणे वरुन सदर आरोपीवर कलम कलम 85 (1)(2) मदाका प्रमाणे गुन्हा दाखल |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वा | | | | |

अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| | पोस्टे वलगाव मर्ग क्र.11 /2025 क.194 बि.एन.एस.प्रमाणे दाखल | रेवसा पुनर्वसन | विलास रामकृष्ण पारीसे वय 32 वर्ष रा.रेवसा पुनर्वसन ता.जि.अमरावती. | रामकृष्ण जानुजी पारीसे वय 70 वर्ष रा. रेवसा पुनर्वसन ता.जि.अमरावती. | हार्ट अटॅक ने मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी हे आपले बयाणात सांगते कि, वर नमुद पत्यावर एक मुलगा व आम्ही पती पत्नी व एक मुलगी तिचे लग्न झाले असुन ते सासरी राहते निंभी येते राहते .माझे घरा शेजारी फिर्यादी यांचा चुलत भाऊ बाळकृष्ण पारीसे यांचे घराचे काम चालु आहे. माझा चुलत भाउ याला दोन मुले आहे त्या तिल एक निलेश हा दारु पिण्याच्या सवई चा आहे. फिर्यादी यांचे शेत विक्री साठी नेहमी एंजेन्ट टच्या माद्यमातुन व्यापारी बोलावतो व आम्ही शेत विकत नाही म्हणुन तो आम्हाला दारु पिवुन शिवीगाळ करतो. काल. दि.01/03/2025 रोजी निलेश पारीसे याने दारु पिवुन शिवीगाळ चालु केल्याने भांडण होवुन पोस्टे वलगाव ला तक्रार दिली. त्यानंतर थोड्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वेळाने फिर्यादी यांचे मुलाला छातीत दुखु लागल्याने डॉ.सदाफळे वलगाव यांचे कडे नेण्यात आले. त्या नंतर त्यांचे छातीत जास्त दुखु लागल्याने ऑम्बुलन्समधुन डॉ.क्टर पंजाबराव देशमुख अमरावती येते आणले परंतु डां.सा.यांनी त्याला चेक करुन मृत घोषीत केले. त्या नंतर त्याला पि.एम.करणे कामी ईर्विन दवाखाना अमरावती येथे नेले.डॉ.सा.यांनी पि.एम.करुन प्रेत अंत्य विधिकरीता नातेवाईक यांचे ताब्यात दिले. वरुन पोस्टे ला येवुन फिर्यादी यांचे बयाणा वरुन सदर चा मर्ग दाखल |